स.फौ.के. नं. ३६८/२०२२

नि. क्र. २५

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – वामन विठ्ठल पानगले,

**वय** – ६२ वर्षे, **व्यवसाय** – हॉटेल मजदुर,

**राहणार** – पांगरी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u>** –

**०१.** दिनांक ०७/१०/२०२२ रोजी मी आरोपीच्या घराजवळ असलेल्या दुकानामध्ये हजर होतो. आरोपी माझ्या ओळखीचा आहे. आमच्या गावच्या पोलीस पाटीलांनी मला तेथे संध्याकाळी ०७:०० ते ०७:३० च्या दरम्यान बोलावले होते. त्यांच्या सांगण्यावरुन मी एका कागदावर सही केली होती. त्यामध्ये मजकूर काय नमूद केला होता हे मी त्यावेळी वाचले नाही. *(साक्षीदारास मालजप्ती पंचनामा दाखविला). त्यावर अनुक्रमांक ०१ वर माझी सही आहे. त्यातील मजकूराबाबत मला माहिती नाही. (**<u>सही पुरत्या भागास निशाणी २६</u>** देणेत आली).*

**०२.** त्यावेळी तेथे माझे छायाचित्र घेण्यात आले. *(साक्षीदारास प्रकरणातील वस्तु – अ कडील छायाचित्र दाखविण्यात आले)*. त्यामध्ये मी, आरोपी व पोलीस असे हजर असल्याचे व सही करताना दिसुन येत आहे. सदर छायाचित्रात आरोपीच्या पुढयात कॅन दिसत असुन तो कशाचा कॅन होता, हे मला माहिती नाही.

***(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)***

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, मी, पोलीस कर्मचारी व दुसरा पंच भिकाजी लोकम असे आम्ही सर्वजन पांगरी, मोठीवाडी येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आरोपी आम्हाला त्याच्या पुढयात प्लॅस्टीकचा कॅन घेवुन दिसला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताब्यातून पोलीसांनी माझ्यासमक्ष दारु जप्त करुन त्यातील काही दारु

रासायनिक पृथःकरणाकरीता काढून घेतली व त्यावर माझ्या सहीचे लेबल लावले. हे म्हणणे खरे नाही की, तसा पंचनामा पोलीसांनी माझ्यासमक्ष केला व तो वाचून, पाहून बरोबर असल्याचे खात्री करुनच मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या गावातील रहीवासी असल्याने त्याला वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.03.11 14:45:19 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,**

**जि. रत्नागिरी.**

**दिनांक –१०.०३.२०२६**

**स्थळः देवरुख**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 10/03/2026 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 10/03/2026 |
| Evidence uploaded on | : | 10/03/2026 |